**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**(जाहिरात क्रमांक – १४/२०१८)**

**महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब (पूर्व) परीक्षा – २०१८**

**पोलीस उप निरीक्षक पदांसाठीचा निकाल**

**घोषणा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. १३ मे, २०१८ रोजी **महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब (पूर्व) परीक्षा – २०१८** घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेमधून पोलीस उप निरीक्षक पदासाठी विकल्प दिलेल्या उमेदवारांमधून पोलीस उप निरीक्षक (मुख्य) परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी जाहीर करण्यात आला आहे. पोलीस उप निरीक्षक पदाकरिता पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाच्या याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२. प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी विहित कालावधीत मुख्य परीक्षेसाठी अर्ज करणा-या व परीक्षा शुल्क भरणा-या अर्हताप्राप्त उमेदवारांना मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. अशा तपासणी नूसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.**

**३.** मुख्य परीक्षेचा संयुक्त पेपर क्रमांक १ दिनांक २६ ऑगस्ट, २०१८ रोजी घेण्यात येईल.

**४.** प्रस्तुत निकालाआधारे पोलीस उप निरीक्षक (मुख्य) परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि. १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार विषयांकित गट-ब पदासाठी विहित केलेली खेळविषयक अर्हता धारण करीत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा विहित दिनांकाचा अहवाल प्राप्त करणे अनिवार्य राहील. तद्नुषंगाने संबंधित खेळाडू उमेदवारांनी त्यांच्या क्रीडाविषयक सर्व प्रमाणपत्राची विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचेकडून तातडीने पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे.

**५.** प्रस्तुत पुर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसव्दारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक राहिल. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही तसेच, पूर्व परिक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरीता स्विकारार्ह ठरतील.

**६.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुदयासंदर्भात विविध मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

**ठिकाण - मुंबई**
**दिनांक - ११ जुलै, २०१८**

**दिपक उराडे**
**अवर सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**